# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२३-२४/२१८

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या परिषदेच्या सन २०२३-२४ मधील दिनांक ८ ऑक्टोबर, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२३-२४ मधील तेरावी सभा रविवार दिनांक ८ ऑक्टोबर, २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता आभासी पध्दतीने आयोजित करण्यात आली आहे.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु.क्र . | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थितीअनुपस्थिती / |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी (कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री.संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | प्रा. सुनिल भिरूड ( प्रभारी कुलसचिव) | निमंत्रित | उपस्थित |
| १२ | श्री. अशोक फळणीकर (वित्त व लेखा अधिकारी) (प्रभारी) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक), (प.म.मु.वि.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

## कार्यसुची

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २ | अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीबाबतची सद्य:स्थिती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | निवडणूक विभाग |
| ठराव | अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीबाबतची सद्य:स्थितीची माहिती कुलसचिवांनी सादर केली. | |
| बाब क्र. ३ | गुप्त अहवालाची माहिती | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | गुप्त अहवालाबद्दल माहिती देण्यात आली. सदर गुप्त अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या आगामी बैठकीमध्ये प्रत्यक्ष सादर करावा असे ठरले. | |
| बाब क्र. ४ | डॉ. संजय सिताराम पाटील यांचा विद्यापीठ आस्थापनेतून राजीनामा मंजूर करणेबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | डॉ. संजय सिताराम पाटील यांना के.एम.आग्रवाल महाविद्यालय येथे सहायक प्रध्यापक पदी रूजू होण्याकरिता २ वर्षाचा धारणाधिकार २०१० मध्ये मंजुर करण्यात आला होता. त्यांना तद्नंतर राजीनामा मंजूर करण्यापूर्वी त्यांचे के.एम.आग्रवाल महाविद्यालयाकडून confirmation बद्दल माहिती मागविण्यात यावी व त्यानंतरच नियमानुसार त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात यावा असे ठरले. | |
| बाब क्र. ५ | श्रीमती मनिषा कौस्तुभ संसारे, सिनियर सिस्टिम प्रोग्रामर यांच्या स्वेच्छा निवृत्तीस मान्यता देण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | श्रीमती मनिषा कौस्तुभ संसारे, सिनियर सिस्टिम प्रोग्रामर यांच्या स्वेच्छा निवृत्तीस खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | 1) The Head, Department of Communication & Journalism ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र) No Objection Certificate (सादर करावे .<br>२ (The Director, Knowledge Resource Centre ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र )No Objection Certificate (सादर करावे .<br>३ (The Finance & Account Section ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र )No Objection Certificate (सादर करावे .<br>४ (The University Engineer ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र) No Objection Certificate (सादर करावे .<br>५( General Administration Department ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र )No Objection Certificate (सादर करावे .<br>६ (The Secretary, University of Mumbai, Employee's Co-op Credit Society Ltd. ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र )No Objection Certificate (सादर करावे .<br><br>सिनियर सिस्टिम प्रोग्रामर हे पद तांत्रिक असुन या पदाची निर्मिती विद्यापीठ स्तरावर करण्यात आली असल्याने सदर पद व्यपगत करण्यात येईल असा ठराव मंजुर करण्यात आला. | |
| बाब क्र. ६ | दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदमध्ये मान्यतेस्तव सादर. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीचे इतिवृत्त आगामी व्यवस्थापन परिषदपुढे पुन:श्च सादर करण्यात यावे असे ठरले. | |
| | **आयत्यावेळी आलेली बाब** | |
| बाब क्र. ७ | मुंबई विद्यापीठातील रिक्त असलेली १. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, २. मुख्य कार्याकारी अधिकारी, नवसंशोधन केंद्र व ३. लोकपाल हि पदे भरण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील रिक्त असलेली १. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, २. मुख्य कार्याकारी अधिकारी, नवसंशोधन केंद्र व हि पदे जाहिरात देऊन भरण्यास सर्वानुमते मान्यता देणयत आली. तसेच ३. लोकपाल ह्या पदावर विहित मार्गाने नियुक्ती होई पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्यासाठी नियुक्त करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मां. कुलगुरू